**L. C. BILL No. III OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA *MATHADI*, *HAMAL* AND OTHER MANUAL WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND WELFARE) ACT, 1969.

**सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ३.**

**महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक २० मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानसभेने दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९६९ चा महा. ३०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० मधील, " श्रमजीवी कामगार " या मजकुराऐवजी, " अंगमेहनतीचे काम करणारे कामगार " हा मजकूर दाखल करणे.

**२.** महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याचे दीर्घ शीर्ष, प्रस्तावना व संक्षिप्त नाव यांसह या संपूर्ण अधिनियमामध्ये, " श्रमजीवी कामगार " हा मजकूर, ज्या ज्या ठिकाणी आला असेल त्या त्या ठिकाणी, " अंगमेहनतीचे काम करणारे कामगार " हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह, दाखल करण्यात येईल.

१९६९ चा महा. ३०.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम २ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये,—

(१) खंड (२) मधील, " कोणतेही काम " या मजकुराऐवजी, " कोणतेही अंगमेहनतीचे काम " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) खंड (३) मधील, " कामावर ठेवलेल्या " या मजकुराआधी, " कोणतेही अंगमेहनतीचे काम करण्यासाठी " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(३) खंड (६) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (६अ) " अंगमेहनतीचे काम " म्हणजे, कोणत्याही प्रकारच्या यंत्रांच्या कोणत्याही मदतीशिवाय किंवा आधाराशिवाय किंवा सहाय्याशिवाय मानवाने केलेले कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रमाचे काम, आणि त्यामध्ये, अनुसूचित नोकऱ्यांमधील माल चढविण्याचे, उतरविण्याचे, रचण्याचे, त्याची ने-आण करण्याचे, त्याचे वजन व मापन करण्याचे अंगमेहनतीचे काम यांचा समावेश होतो ; " ;

(४) खंड (७) मधील, " असंरक्षित कामगारांना " या मजकुराआधी, " कोणतेही अंगमेहनतीचे काम करण्यासाठी " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(५) खंड (११) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (११) " असंरक्षित कामगार " म्हणजे, ज्याला कोणत्याही अनुसूचित नोकरीतील अंगमेहनतीचे काम करण्यासाठी कामावर ठेवले असेल, किंवा कामावर ठेवावयाचे असेल ; आणि असा अठरा वर्षे व त्यावरील वयाचा, आणि पासष्ट वर्षांपर्यंत वय असलेला,— आणि त्यानंतर, जर शासनाने प्राधिकृत केलेल्या वैद्यक व्यवसायीने असे काम करण्यासाठी तो शारीरिकदृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणित केले असेल तर, त्या वयाचा माथाडी, हमाल किंवा इतर अंगमेहनतीचे काम करणारा कामगार, परंतु, त्यात,—

(अ) कोणत्याही आस्थापनेचे, उद्योगाचे किंवा कारखान्याचे वस्तूनिर्मिती प्रक्रिया क्षेत्र किंवा संचय व साठवणूक क्षेत्र येथे, अथवा जेथे कोणत्याही आस्थापनेमधील, उद्योगामधील, किंवा कारखान्यामधील यांत्रिक प्रक्रियेमार्फत किंवा यंत्रामार्फत किंवा स्वयं-चलित प्रक्रियेमार्फत प्रक्रिया केली जात असेल तेथे, मालकाने किंवा मूळ मालकाने कामावर ठेवलेल्या कोणत्याही कामगाराचा (अंगमेहनतीचे काम करण्यासाठी ज्याला कामावर ठेवले असेल किंवा कामावर ठेवावयाचे असेल त्याखेरीज) ;

(ब) मालकाच्या कुटुंबातील सदस्याचा,

समावेश होणार नाही ; " ;

(६) खंड (१२) मधील, " श्रमाचे काम " या मजकुराऐवजी, " अंगमेहनतीचे काम " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ३ ची सुधारणा.

"(क) असंरक्षित कामगारांची भरती करणे व त्यांना योजनेत प्रवेश देणे, आणि असंरक्षित कामगारांची नोंदणी पुस्तके व प्रतीक्षा यादी ठेवणे, नोंदणी पुस्तकांतील व प्रतीक्षा यादीतील त्यांची नावे, एकतर तात्पुरती किंवा कायमची काढून टाकणे, आणि नोंदणीसाठी फी लादणे यांसह असंरक्षित कामगारांची व मालकांची नोंदणी करणे व नोंदणी रद्द करणे यांचे नियमन करणे ; ".

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मधील, पोट-कलम (१) मध्ये, दुसऱ्या परंतुकामधील, खंड (ब) मध्ये, " कामगार " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी, " असंरक्षित कामगार " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ४ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये,— सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम १३ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) मधील, " कामगाराकडून " या मजकुराऐवजी, " असंरक्षित कामगाराकडून " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (३) मध्ये, " कर्मचाऱ्यास " या मजकुराऐवजी, " असंरक्षित कामगार " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) समास टिपेमधील, " कामगार " या मजकुराऐवजी, " असंरक्षित कामगार " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मध्ये,— सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम १४ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (१अ) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर कोणत्याही कारणास्तव सल्लागार समिती कार्यरत नसेल तर, राज्य शासनास, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी, सल्लागार समितीच्या सल्ल्याशिवाय किंवा तिच्याशी विचारविनिमय केल्याशिवाय, अधिसूचना काढता येईल किंवा निर्णय घेता येईल.";

(२) पोट-कलम (६) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (६) (अ) राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांव्यतिरिक्त, सल्लागार समितीच्या सदस्यांचा पदावधी, त्यांच्या नावांची अधिसूचना, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षे इतका असेल. असे सदस्य, शासनाची मर्जी असेपर्यंत, पद धारण करतील.

(ब) राज्य शासन, राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्यांची रिक्त पदे, लवकरात लवकर व कोणत्याही परिस्थितीत, असे पद रिक्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिने समाप्त होण्यापूर्वी भरील.".

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम १६ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मध्ये, स्पष्टीकरणामधील, " चौदा " या मजकुराऐवजी, " अठरा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

[ **सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३.**]

[ **महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**]

[ **श्री. आकाश फुंडकर,**
कामगार मंत्री.]

[ **विधानपरिषदेने दिनांक २० मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.**]

[ **विधानसभेने दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.**]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई